MHKO030019892017

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ७३६/२०१७**

**निशाणी क्रमांक ४९ खालील आदेश**

संतोष विनायक नाईकनवरे विरुध्द

साईदत्त मोटर्स

१. प्रस्तुतचा अर्ज फिर्यादीतर्फे त्याचेविरुध्द झालेला पुरावा नाहीचा आदेश सेट असाईड होऊन मिळणेकरीता केलेला आहे.

फिर्यादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

२. प्रस्तुत कामी फिर्यादीचा अंशतः पुरावा झालेला असून न्यायालयाने दि.१६/१२/२०२२ रोजी फिर्यादीविरुध्द पुरावा नाहीचा आदेश पारीत केला आहे. फिर्यादीने न्यायालयात हजर राहणेस अगर उलटतपास देणेकरीता कोणताही हलगर्जीपणा अगर टाळाटाळ केलेली नाही. फिर्यादी हे मागील तारखेस त्यांच्या भाचीच्या विवाहसोहळयानिमित्त लातूर येथे गेले होते त्यामुळे ते न्यायालयात गैरहजर राहीले. फिर्यादीचा पुरावा अभिलेखावर आलेस खटल्याचा निवाडा होणेस मदत होणार आहे. न्यायाच्या व समतेच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर झालेस आरोपीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर झालेस फिर्यादीचे कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे फिर्यादीविरुध्द झालेला पुरावा नाहीचा आदेश रद्द करण्यात यावा. करीता सदरचा अर्ज.

आरोपीतर्फे प्रस्तुत अर्जास म्हणणे थोडक्यात खालीलप्रमाणे–

३. फिर्यादीतर्फे दिलेला अर्ज हा पुर्णपणे चुकीचा, खोटया कथनांचा व कायदयाच्या विरुध्द असून चालणेस व मंजूर होणेस पात्र नाही. फेब्रुवारी २०२२ पासून फिर्यादी याकामी हजर नाहीत. अर्जात कोणतेही कायदेशीर कारण नमूद नाही. प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र नाही. त्यामुळे फिर्यादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. दोन्ही बाजूंचा विस्तृत युक्तीवाद लक्षपूर्वक ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता फिर्यादीविरुध्द दि.१६/१२/२०२२ रोजी पुरावा नाहीचा आदेश पारीत झाल्याचे दिसून येते. आरोपीने फिर्यादीच्या अर्जास लेखी जोरदार हरकत घेतली आहे. फिर्यादीने दिलेली कारणे विचारात घेता फिर्यादीचा अर्ज मंजूर करणे न्यायाच्या हिताच्या दृष्टीने गरजेचे असल्याचे दिसून येते. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रस्तुत प्रकरण शीघ्र गतीने गुणावगुणांवर निर्णित होण्यास मदत होईल, अनेक अर्जांची उत्पत्ती टाळता येईल आणि फिर्यादीची बाजू अभिलेखावर येण्यास मदत होईल. फिर्यादीचा उलटतपास घेण्याची संधी आरोपीस उपलब्ध आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल. करीता मी खालीलप्रमाणे न्यायोचित आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. फिर्यादीविरुध्द दिनांक १६/१२/२०२२ रोजी झालेला पुरावा नाहीचा आदेश रु.२,०००/– कॉस्ट जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कोल्हापूर व रु.१,०००/– कॉस्ट आरोपी यांना देण्याच्या अटीवर सेट असाईड करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRAJAKTA BHIMRAO PATIL
Date: 2023.06.12 17:22:36 +0530

कोल्हापूर
दिनांक – १२/०६/२०२३.

( पी. बी. पाटील)
५ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोल्हापूर.